**<u>परक्या भूमीवर घर</u> (पुस्तक परीक्षण)**

काही व्यवसायांमध्येच समाजसेवा आणि पैसा अशा दोन्ही गोष्टींचं एकाच वेळी समाधान मिळू शकतं. त्यातले दोन म्हणता येतील असे म्हणजे डॉक्टर आणि फॅमिली कौन्सेलर. या दोन्ही व्यवसायांना लागणारी सहनशक्ती, दुसऱ्याच्या दु:खात गुंतून न जाता मात्र त्याला योग्य ती सहानुभूती दाखवत पेशंट किंवा समुपदेशनासाठी आलेल्या व्यक्तींना सल्ला देणे ही अजिबात सोपी गोष्ट नाही. अत्यंत हृदयद्रावक कथा असणारा सिनेमा आपण पाहून आलो तरी दोन तीन दिवस आपल्या मनात सारखे त्याबद्दल विचार घोळत राहातात तर इथे तर सगळ्या खऱ्या केसेस! त्यातूनही पैशाची अपेक्षा न करता केवळ समाजसेवेच्या भावनेतून समुपदेशनाच्या क्षेत्राकडे बघणाऱ्या व्यक्ती विरळा !

भारतातील भ्रष्टाचारामुळे स्वतःवर ओढवलेल्या आर्थिक आपत्तीला खरं तर विटूनच कॅनडात स्थायिक झालेल्या स्मिता भागवत या विनामूल्य काम करणाऱ्या यशस्वी समुपदेशक. कॅनडात आल्यावर सुद्धा खूप कष्टाने त्या सेटल झाल्या. पुढे समुपदेशनाचं काम करतना परदेशातल्या भारतीयांचे त्यांना वेगवेगळे अनुभव आले. त्या अनुभवातूनच स्मिता भागवत यांचं 'परक्या भूमीवर घर' हे पुस्तक. सुरुवातीलाच परदेशात व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झालेल्या भारतीयांची समाजाबद्दलची असंवेदनाक्षमता हुबेहूब ओळखून ती चपखल शब्दांत लेखिकेने मांडली आहे. त्यात लेखिकेचा स्पष्टवक्तेपणा दिसतो आणि स्वतःचे पाय जमिनीवर आहेत हे लक्षात येतं.

या कथासंग्रहातील बहुतेक सर्व कथा वाचून स्तंभित व्हायला होतं. या प्रत्येक कथेत लेखिकेने अत्यंत योग्य दृष्टीकोनातून फार उत्तम मार्गदर्शन केलं आहे. पण महत्वाची गोष्ट म्हणजे यात जे जोडीदार बळी गेले आहेत त्यांनी निराश न होता आपल्यावर आलेली दुर्दैवी परिस्थिती ज्या शहाणपणे हाताळली आहे त्याचं कौतुक करावं तेवढ थोडं आहे.

भारतीय संस्कृतीतल्या संस्कारांचा किंवा रुढींचा दुष्परिणाम म्हणा, समीर या कथेतला समीर लग्न करून ज्या पद्धतीने होरपळून निघतो ते वाचून हृदयात कालवाकालव होते. कॅनडात स्थायिक झालेल्या आणि थोडे दिवस भारतात आलेल्या नेहाशी त्याचं लग्न होतं. आजोबांचा आग्रहापोटी आई वडिलांनी निवडलेल्या समीरशी ती लग्न करते. पण कॅनडात एका काळ्या माणसाबरोबर ती आधीपासूनच राहात असते. समीरला त्याचा उलगडा एअरपोर्टवर उतरल्यावर होतो आणि त्याच्या पायातली शक्ती निघून जाते. फसवणूक करूनच्या करून वरती कॅनडाचं Permanent Resident Card किती सहज मिळालं असं म्हणण्याचा उद्धटपणा म्हणजे नेहाच्या बेमुर्वतखोरपणाची हद्द आहे. पण या सगळ्यातून बाहेर येऊन समीर आज सुखाचं जीवन जगत आहे. त्याने नेहाला धडा तर शिकवलाच आहे पण मोठ्या मनाने माफही केलंय.

विरल, अमी आणि भरत यांची वेगळीच केस. ‘पहेली’ सिनेमातल्या शाहरुख खानसारखा विरल. लग्नाच्या दिवशीही बायकोपेक्षा पैशावर जास्त प्रेम करणारा. अमीची शारीरिक भूक काय आहे, तिच्या लग्नाच्या अपेक्षा काय आहेत याचा गंध नसलेला. अशा वेळी एखाद्या तरुण लग्नातुर व्यक्तीचं दुसऱ्या पुरुषाकडे लक्ष गेलं नाही तरच नवल. भरतच्या रूपाने तिच्या आयुष्यात तिला हवा तसा पुरुष येतो आणि एखाद्या हिंदी सिनेमातल्या कथेत साजेल त्या पद्धतीने ती त्याच्याकडे आकर्षित होते. अशा वेळी अमी flirt आहे असा आरोप करणं अतिशय सोपं असतं. पण अमीने योग्य तो निर्णय घेऊन भरतशी लग्न केल्यामुळे निदान उर्वरित आयुष्य तरी ती सुखात घालवू शकते. विजोड जोडप्याची जोडी योग्य पद्धतीने सुटते.

निखील आणि प्रेरणाची कथा म्हणजे आजच्या सुखवस्तू जोडप्यांना जो सुख दुखण्याचा रोग जडला आहे तशी आहे. आपल्याला शेवटपर्यंत प्रॉब्लेम काय आहे ते कळत नाही. अशा केसेस मध्ये समुपदेशन करण्यापेक्षा अशा जोडप्यांना दोन रट्टे लगावून दिले तर याच काय पण भविष्यातल्या केसेसही टाळता येतील.

'चुकलेला जीवनव्यवहार' मधला संजय आणि त्याची पत्नी यांच्यातील तणाव खूप वेदनामय आहे. अत्यंत विचारपूर्वक लग्न करूनही केवळ दुर्दैव म्हणून संजयला अविचारी पत्नी मिळते. स्वार्थी विचारांनी बरबटलेल्या या मुलीमुळे संजयसारख्या सभ्य माणसाच्या आयुष्याचा विचका होतो. परप्रांतीय याराच्या नादी लागून फसवणूक करणाऱ्या या मुलीच्या कचाट्यातून सुटून संजय गाडी परत रुळावर आणून सुरुवात करतो हे त्याचं असामान्यत्व.

या आणि अशा वेगवेगळ्या प्रकारच्या केसेस स्मिता भागवतांनी अतिशय कौशल्याने हाताळल्या आहेत. त्यांचं या क्षेत्रातील कौशल्य तर दिसतंच पण साहित्य म्हणून एका दर्जेदार पुस्तकाची ही निर्मिती म्हणता येईल. या कथांमध्ये बहुतांशी पुरुष भरडले गेले आहेत. ते वाचून आता काळाच पारडं फिरलंय आणि आता स्त्रीमुक्तीच्या ऐवजी पुरुषमुक्ती करायची वेळ आली आहे की काय असा प्रश्न पडतो. काही कथा वाचून लग्नसंस्थेवरचा विश्वास उडतो. कितीतरी केसेस भारतीयांचा ठराविक प्रकारच्या मानसिक धारणेमुळे घडतात. उदा. आजोबांचा नातीने त्यांच्या हयातीत लग्न करण्याचा हट्ट. ‘एक क्षण सैतानाचा’ या कथेतल्या पत्नीवर वर्चस्व गाजवून स्वतःचे निर्णय कुटुंबावर लादणाऱ्या वडिलांचा. पाश्चिमात्य संस्कृतीत अशा घटना घडणारच नाहीत. कारण त्या संस्कृतीत खऱ्या अर्थाने व्यक्तीस्वातंत्र्य जपले जाते. पण असं असतानाही लेखिकेने प्रभावी समुपदेशन करून कित्येक संसार वाचवले आहेत. त्यांनी घेतलेला समाजसेवेचा वसा यशस्वीपणे स्वतःचे प्रॉब्लेम्स विसरून चांगल्या पद्धतीने चालवला आहे हे या पुस्तकातून नक्कीच प्रतिबिंबित होतं.

**- नीलिमा वीरकर**